Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

## Notice

Notice No. 42 Displayed on : 11/06/2021

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिष्यवृत्तीचा लाभ घेणा–या सर्व विद्यार्थ्यांना महत्वाची सूचना.

शैक्षणिक वर्ष २०१८–१९, २०१९–२० व २०२०–२१ मधील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील जे विद्यार्थी शिष्यवृत्तीचे लाभार्थी आहेत. परंतु सदरील विद्यार्थ्यांचे आधारकार्ड बॅक खातेशी संलग्न नसल्याने अद्याप काही विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही, असे निदर्शनास आलेले आहे. तरी या अनुषंगाने महाडीबीटीने विद्यार्थ्यांना आपले आधारकार्ड लिंक आहे की नाही हे सहजरित्या समजण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर सुविधा उपलब्ध करुन दिली आहे .

यासाठी विद्यार्थ्यांनी स्वत:चा युजर आय.डी. व पासवर्ड टाकून फॉर्म ओपन केल्यानंतर स्क्रीनच्या डाव्या बाजूला आधार बॅक लिंक हे ऑप्शन दिलेले आहे. यावर क्लीक केल्यानंतर गेट आधार स्टेटस् असे येते व त्याच्यावर क्लीक केल्यानंतर विद्यार्थ्यांचे आधारकार्ड लिंक आहे की नाही हे संबधित विद्यार्थ्यास समजते. तरी, शिष्यवृत्तीचा लाभ घेणा–या सर्व विद्यार्थ्यांनी याप्रमाणे कार्यवाही करावी. जेणेकरुन आपली शिष्यवृत्तीची रक्कम लवकरात लवकर आपल्या बॅक खात्यावर जमा होईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य